بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat



Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)


# ईश्वरीय आज्ञापन, पवित्र पैगंबराचे आदर्श आणि जमाअतीय परंपरेच्या अधीन सल्लागार समिती'ची वास्तविकता आणि महत्त्वाचं उल्लेख तसेच पदाधिकारी आणि शूरा सदस्यांच्या जबाबदाऱ्याविषयी मार्गदर्शन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १२ मे २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشۡهَدُ أَنۡ لَّا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيۡطٰنِ الرَّجِيۡمِ۔
بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ مٰلِكِ يَوۡمِ الدِّيۡنِ۔ إِيَّاكَ نَعۡبُدُ وَإِيَّاكَ نَسۡتَعِيۡنُ۔ اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِيۡمَ۔ صِرَاطَ الَّذِيۡنَ أَنۡعَمۡتَ عَلَيۡهِمۡ غَيۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَيۡهِمۡ وَلَا الضَّآلِّيۡنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा आणि सुरह आले इम्रानची आयत १६०

فَبِمَا رَحۡمَةٍ مِّنَ اللّٰهِ لِنۡتَ لَهُمۡ وَلَوۡ كُنۡتَ فَظًّا غَلِيۡظَ الۡقَلۡبِ لَانۡفَضُّوۡا مِنۡ حَوۡلِكَ فَاعۡفُ عَنۡهُمۡ وَاسۡتَغۡفِرۡ لَهُمۡ وَشَاوِرۡهُمۡ فِي الۡأَمۡرِ فَإِذَا عَزَمۡتَ فَتَوَكَّلۡ عَلَى اللّٰهِ إِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الۡمُتَوَكِّلِيۡنَ

पठन केल्यानंतर हुजूर अनवरनी त्याचे अनुवाद प्रस्तूत केले,

अनुवाद-''आणि अल्लाहची मोठी कृपा आहे की तू त्यांच्याप्रती दयाळू आहेस, आणि जर तू उग्र स्वभावाचा आणि कठोर मनाचा असतास तर ते लोक तुझ्याजवळून निश्चितच निघून गेले असते. म्हणून त्यांना क्षमा, आणि त्यांच्यासाठी क्षमेची याचना कर, आणि (प्रशानाच्या) संबंधात त्यांच्याशी सल्लामसलत कर, आणि जेव्हा तू निश्चय करशील, तेव्हा अल्लाहवर भरवसा ठेव. जे भरवसा ठेवतात त्यांच्यावर अल्लाह प्रेम करतो.

आजकाल वेगवेगळ्या देशांमध्ये (मज्लि-ए-शूरा) सल्लागार समितीचे आयोजन होत आहे. काहीं देशांमध्ये ते संपन्न झाले असून इतर देशांत होणे अपेक्षित आहे, (मज्लिस ए शूरा) सल्लागार समितीचे महत्त्व आणि प्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या याकडे मी आधीच लक्ष दिले आहे. बरीच वर्षे उलटून गेल्यावर, सर्वशक्तिमान अल्लाहच्या आदेशानुसार, पवित्र प्रेषित(स.) यांच्या शिकवणीनुसार आणि जमाअतच्या परंपरा आणि चालीरीतींनुसार आज पुन्हा याबद्दल काही बोलणे मला योग्य वाटले. (मज्लिस-ए-शूरा) सल्लागार समिती जिथे संपन्न झालेली आहे तेथील सदस्यांनी सुद्धा या गोष्टींपासून लाभ घ्यावे, जे त्याच्या सदस्यांसाठी निर्धारित आहेत; कारण सदस्यांच्या काही जबाबदाऱ्या मजलिस

शुराच्या शिफारशी आणि खलिफाच्या निर्णयानंतरच सुरू होतात. या निर्णयांवर अंमलबजावणी करणे प्रत्येक सल्लागार सदस्याचे कर्तव्य आहे.

मी पठन केलेल्या श्लोकात, जिथे हे पुष्टी करण्यात आली आहे की अल्लाहच्या विशेष दयेने पवित्र पैगंबर (स.) यांचे त्यांच्या अनुयायींसाठी अतिशय कोमल हृदय होते, तिथेच लक्ष वेधले गेले आहे की, ज्या लोकांवर पवित्र प्रेषित (स.) यांनी अदा केलेली जबाबदारी सोपविण्यात आली आहे आणि त्यांच्या कार्याला हजरत अपेक्षित मसीह यांच्या अधीन राहून राबवणे विहित करण्यात आले आहे, त्यांचे देखील हे कर्तव्य आहे की त्यांनी स्नेह आणि प्रेमपूर्वक मनाने कार्य अदा करावे.

सर्वशक्तिमान अल्लाह फरमावितो की, जर उग्र स्वभावाचे प्रकटन केले, राग प्रकट केले तर लोक तुझ्याजवळून निश्चितच निघून जातील. म्हणून अल्लाह क्षमा मागणे, याचना करणे आणि सल्लामसलत करण्याचे आदेश देतो. या कारणास्तव सल्लागार समितीचे आयोजन केले जाते. जसे की या समितीच्या नावाने हे अभिप्रेत होते की हे निर्णय कायम करण्याची समिती नव्हे तर एक सल्लगार सभा आहे. म्हणून असे सांगण्यात आले आहे की, सल्ल्यावर जो निर्णय घ्याल त्याविषयी अल्लाहवर विश्वास ठेवून कृती कर, त्यानंतर अल्लाह याविषयी अनंत कृपा आणि आशीर्वाद प्रकट करेल.

'तवक्कल'चे (अल्लाहवर भरवसा ठेवणे) सर्वोच्च उदाहरण पवित्र प्रेषित (स.) यांच्या व्यक्तीमत्वातून दिसून येते. त्यांना सर्वशक्तिमान अल्लाहकडून अनेक बाबतींत प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळाले, परंतु ज्या गोष्टींमध्ये स्पष्टता नव्हती अशा बाबींमध्ये त्यांनी नेहमी सल्ला घेतला. त्यांची कृती आणि अल्लाहची ही आज्ञा, आम्हाला समजावण्यासाठी आहे की जमाअतच्या अधिकाऱ्यांनी जमाअतच्या सदस्यांशी कसे वागले पाहिजे आणि नेहमी एकमेकांशी सल्लामसलत करून कार्य केले पाहिजे. अल्लाहचे उपकार आहे की त्याने जमाअत अहमदियाला खिलाफतची देणगी दिली आहे. म्हणून तत्कालीन खलीफा अल्लाहच्या आदेशानुसार आणि पैगंबरांच्या सुन्नतनुसार जगभरातील जमाअतपासून त्यांच्या त्यांच्या परिस्थितीनुसार सल्ला घेतो. सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र प्रेषित (स.) यांना प्रत्येक बाबतीत मार्गदर्शन केले असते, परंतु पैगंबर (स.अ.) यांना काही बाबतींत सल्ला देण्याचे आदेश देऊन आणि काही बाबतींत त्यांचा सल्ला घेणे, हे खरे तर आम्हाला सत्मार्गाकडे मार्गदर्शन करण्यासाठी, परस्पर सल्ला आणि

सहकार्याने काम करण्यासाठी आणि जमाअतमध्ये एकोपा निर्माण करण्याच्या उद्देशाने हे आदेश धाडले आहे.

याविषयी एका हदीसद्वारे स्पष्टीकरण दिले आहे. हजरत इब्ने अब्बास सांगतात की जेव्हा شَاوِرْهُمْ فِي الْأَمْرِ आयत अवतरली तेव्हा पैगंबर (स.) म्हणाले की अल्लाह आणि त्याचा प्रेषित यापासून मुक्त असले तरी अल्लाहने याला माझ्या अनुयायींसाठी एक कृपा म्हणून अवतरीत केले. त्यामुळे जो सल्ला घेतो तो शहाणपणा आणि मार्गदर्शनापासून वंचित राहणार नाही आणि जो सल्ला घेत नाही तो अपमान टाळू शकणार नाही. म्हणून प्रेषित (स.) या सल्ल्यांपासून मुक्त होते; परंतु असे असूनही, त्यांनी एक उदाहरण आमच्यासमोर ठेवण्यासाठी सल्ला घेतला जेणेकरून उम्मत नेहमीच अल्लाहच्या दयेत सहभागी होईल आणि नेहमी मार्गदर्शन आणि सत्याच्या मार्गावर अग्रसर राहील.

तर ही अल्लाहची विशेष कृपा आहे की आमच्यामध्ये सल्लागार प्रथेची स्थापना केली. त्यामुळे सर्वसाधारणपणे प्रत्येक अहमदी आणि विशेषतः प्रत्येक शूरा सदस्याने अल्लाहचे आभार मानले पाहिजे की त्याने आम्हाला मार्गदर्शनाचे साधन प्रदान केले आहे.

पवित्र प्रेषित (स.) यांचा सल्ला घेण्याचे साधारणपणे तीन मार्ग किंवा पद्धत होत्या, ज्यांना खलिफांनीही नंतर कायम ठेवले आणि हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी देखील अंगीकारले. पहिली पद्धत- एखादा कार्य ज्यामध्ये सल्ला घेण्याची गरज भासते तेव्हा एक व्यक्ति याची घोषणा करत असे आणि तद्नंतर लोक जमा होत असे आणि मग त्याविषयी सल्ले घेतल्यानंतर पवित्र पैगंबर (स.) निर्णय देत असे. दुसरी पद्धत अशी होती की प्रेषित (स.) ज्यांना सल्ला देण्यास पात्र समजत त्यांनाच बोलावायचे आणि मग त्या मोजक्या लोकांचा सल्ला घेतला जायचा. तिसरी पद्धत-जिथे पैगंबरांना असे वाटत असे की याठिकाणी दोन व्यक्ति जमा होऊ शकत नाहीत किंवा अन्य काही कारणाने जमा होत नाहीत तर ते दोन्ही जणांकडे वेगवेगळे जाऊन त्यांचा सल्ला घेत असे. हजरत अबू हुरैराह (र.ज.) सांगतात की, मला पवित्र पैगंबर (स.) पेक्षा त्यांच्या साथीदारांकडून अधिक सल्ला मागणारा कोणी सापडला नाही. जेव्हा अल्लाहच्या संदेष्टाने, ज्याला थेट परमेश्वराकडून मार्गदर्शन मिळत होते, त्याने इतके सल्ले घेतले तर सल्लामसलत करण्यावर किती भार आम्ही सर्वसाधारण लोकांनी दिले पाहिजे याकडे लक्ष देणे आणि त्याचे महत्त्व समजून घेणे किती आवश्यक आहे.

बद्रच्या मैदानातही, पवित्र प्रेषित (स.) यांना सल्ला दिल्यानंतर साथीदारांनी त्याची अंमलबजावणी करण्यात आपल्या प्राणांची आहूती दिली. म्हणून शुराच्या सदस्यांनी हे लक्षात ठेवावे की, आमचा सल्ला व निर्णय मान्यतेनंतर पाळण्यासाठी सर्वप्रथम सर्व प्रकारचा त्याग करण्यास तयार होणे गरजेचे आहे. तुम्ही अशा विभागाचे सदस्य आहोत, जो खिलाफत परंपरा आणि जमाअतीय व्यवस्थापनाचा एक सहाय्यक विभाग आहे. सल्ले देणाऱ्यांचे सल्ले सद्भावना आणि धार्मिकतेच्या सर्वोच्च मानकांवर आधारित असावेत. म्हणून सल्ले देणाऱ्यांनी हे निरखून पाहावे की त्यांच्यात कितपत सदाचरण आहे. हजरत अली (र.ज) चे एक कथन आहे की, شاورالفقهاء والعابدين म्हणजेच, ज्ञानी आणि धार्मिक लोकांचा सल्ला घ्या. प्रत्येकाकडून नाही. ही लोकप्रतिनिधींची गुणवत्ता आहे. यामध्ये अशा लोकांना आदेशित करण्यात येते की, जे शूराचे प्रतिनिधी निवडतात त्यांना त्यांच्यापैकी जे सुदृढ वाटतात, जे धार्मिक ज्ञानात चांगले आहेत आणि ज्यांचे उपासनेचे दर्जे चांगले आहेत अशा लोकांना निवडावे. हे प्रमाण समोर ठेवून जिथे जिथे प्रतिनिधी निवडले जातात तिथे या प्रतिनिधींच्या मतात लक्षणीय फरक असल्याचे मी पाहिले आहे. खलीफा तर असा विश्वास बाळगतो की, जेव्हा लोकांनी अल्लाहच्या आदेशानुसार आपले प्रतिनिधी निवडले आहेत तर त्यानुसार ते त्यांचा प्रतिनिधीत्वाचा अधिकार पूर्ण करत असतील आणि जर प्रतिनिधी त्यांचे अधिकार पूर्ण करत नसतील तर ते जमाअतच्या लोकांच्या विश्वासाला आहत करत असून खलिफाच्या विश्वासाचा देखील वध करत आहेत.

शूराचे प्रतिनिधित्व एक वर्षासाठी केले जाते ज्यामध्ये प्रशासनाला सहकार्य करणे, निर्णयांवर स्वतः अंमल करणे आणि करून घेणे आहे. नेहमी याकडे लक्ष द्यावे की लोक कितपत खलीफाच्या निर्णयांवर अंमल करत आहेत. निर्णय घेताना अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा बळी जातो आणि त्या पद्धतीने कार्यवाही होत नाही जशी असायला हवी. अशा वेळी संबंधित अधिकारी व केंद्राला कळवावे. बहाणे करून ते या जगात सुरक्षित राहतील, पण सर्वज्ञ परमेश्वर याबाबतीत तुमच्याशी विचारपूस नक्कीच करेल. एखाद्या अधिकाऱ्याशी मतभेद झाल्यावर काही सदस्य केंद्राला कळवतात, तेही दुरुस्त नाही.

जमाअतकडून काही प्रस्ताव पुन्हा पाठवणे म्हणजे त्यांची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे अशा लोकांनी आणि अधिकाऱ्यांनी सद्गुणांवर चालणे, त्यांच्या हक्कांची पूर्ती करणे, खिलाफतची आज्ञा पाळणे आणि त्यांची प्रतिज्ञा पूर्ण

करणे यावर कितपत राहून कार्य केले आहे, याचा विचार करायला हवा. केंद्र शासनाने लाज व्यक्त केली पाहिजे की आम्ही त्याची अंमलबजावणी करू शकलो नाही, परंतु या वर्षी आम्ही त्याची अंमलबजावणी करू आणि जर आम्ही अंमलबजावणी केली नाही तर आम्ही दोषी असू. आणि कर्तव्यांची पूर्ती न करणारांमध्ये आम्ही गणले जाऊ, अशी क्षमा मागून लिहावे की यावर्षी आम्ही या हा प्रस्ताव सादर करू नये अशी शिफारस करत आहोत. यामुळे किमान प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना हे लक्षात येईल की आपण एक मोठा कृती आराखडा तयार करून खलिफाकडे सादर केला आणि नंतर अंमलबजावणी न करून आम्ही दोषी झालो आणि खलीफाच्या विश्वासाला आहत केले आहे. या अर्थाने, जेथे सामूहिकपणे आत्मपरिक्षण आवश्यक आहे तिथेच वैयक्तिकरित्या देखील आत्मपरिक्षण करावे आणि आपल्या उणीवांबद्दल क्षमायाचना करावे आणि उणीवांचे कारणे शोधावे. आणि खरे पाहिल्यास, हे आत्मपरिक्षणच आम्हाला आमचे कार्य खऱ्या अर्थाने करण्यात सहाय्यक ठरतील, अन्यथा तोंडी उच्चारण काहीच लाभ देणार नाहीत.

आपले व्यावहारिक आदर्श, लोकांशी असलेले प्रेमळ नाते, त्यांच्या वेदना जाणणे आणि जिव्हाळा निर्माण करणे, खलिफाच्या आज्ञापालनाचा दर्जा उंचावणे, हा गुण जर प्रत्येक अधिकारी आणि शूराच्या सदस्यात निर्माण झाला तर एक क्रांतिकारी बदल आपणास पहायला मिळेल. शूरा आयोजित करण्यामागचा हेतू जिथे आदर्शरित्या दुरुस्त करण्याचा असतो तिथेच नियोजित पद्धतीने इस्लाम आणि एकेश्वरवादाला संपूर्ण जगात प्रसृत करणे देखील आहे, जेणे करून एक क्रांती जगात उत्पन्न होईल.

हुजूर अनवर यांनी, हजरत अपेक्षित मसीह व महदी(अ.स.) यांच्या वचनांच्या प्रकाशात, सदाचरणावर अग्रेसर राहून आपापल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकडे लक्ष वेधत म्हणाले की, अल्लाह आम्हा सर्वांना धार्मिकतेवर चालून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची क्षमता देवो. अल्लाह आमच्या चुका, उणीवा आणि कमकुवतपणा झाकून ठेवत त्याच्या कृपेने आशीर्वाद देत राहो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ.
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ.